**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**

**महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या**

(A Government of Maharashtra Undertaking)

( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

**Dadasaheb Phalke Chitranagari (दादासाहेब फाळके चित्रनगरी ) गोरेगाव पूर्व, मुंबई**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

---

## महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामध्ये ई-ऑफिस सुरु होणार

**------------------------**

### व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांचे विभागांना निर्देश

दाफचि २२: महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामध्ये ई-ऑफिस प्रणाली सुरु करण्याचे निर्देश व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी विभागांना दिले आहेत. त्यामुळे महामंडळामध्ये ई-ऑफिस प्रणाली लवकरच कार्यान्वित होणार सुरु असून आज (सोमवारी) महा-आयटीच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक संजय कृष्णाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाच्या बैठक हॉलमध्ये संपन्न झालेल्या प्रशिक्षणासाठी मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, व्यवस्थापक ( कलागारे ) विजय भालेराव, उप मुख्य लेखाधिकारी राजीव राठोड, उप व्यवस्थापक ( नियोजन व विकास ) मुकेश भारद्वाज, सहाय्यक व्यवस्थापक ( कलागारे ) रुचिता पाटील, सहाय्यक व्यवस्थापक ( कलागारे ) मोहन शर्मा, व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक अनिता कांबळे, सांस्कृतिक समन्वयक मंगेश राऊळ यांसह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. या प्रणालीचा वापर कशाप्रकारे करायचा आहे याबाबतची माहिती महा-आयटीचे तज्ज्ञ सुरेश सुरा यांनी प्रशिक्षणांच्या माध्यमातून महामंडळाच्या अधिकारी-कर्मचारी यांना दिली.

नागरिकांना जलद, पारदर्शक, कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देण्यासोबत शासकीय कामकाज अधिक स्मार्ट व गतिमान होण्यासाठी राज्यात ई-ऑफिस प्रणाली राबविली जात आहे. ई-

ऑफिसमध्ये एखाद्या विषयाची फाईल ही पुर्णपणे ऑनलाईनच सादर होत असल्याने फाईलींचा पसारा कमी होतो तसेच कामाची गती वाढते.

आता महामंडळाच्या अंतर्गत प्रशासकीय कामासाठी-ई ऑफिस प्रणालीचा वापर केला जाणार असल्याने पेपरलेस कामकाजालाही गती मिळणार आहे. त्यामुळे फाईलींचा निपटारा वेळेत होण्यास मदत होणार असून कामात पारदर्शकता, गतिमानता देखील येणार आहे.